सिंहस्थ कुंभमेळयाच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्पास सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
(रु.१४८२.९५ कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक नामपा-२०२५/प्र.क्र.१६१/नवि-२५**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक : ०९ जून, २०२५**

संदर्भ :-

१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र: कुंभमे २०२३/प्र.क्र.१८३/नवि- २५, दिनांक १४ डिसेंबर, २०२३.
२. नगर विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र : कुंभमे २०२३/प्र.क्र.१८३/नवि- २५, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४.
३. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याबाबतचा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रमांक ५, दिनांक ४ जून २०२५.
४. नाशिक महानगरपालिकेने सदर प्रकल्पास दिलेली तांत्रिक मान्यता दिनांक ११ मार्च, २०२५.

**प्रस्तावना :-**

सन २०२७-२८ या कालावधीत नाशिक येथे भव्य अशा सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. हे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाचे आयोजन असून, संपूर्ण देशभरातून तसेच परदेशातून कोट्यवधी भाविक, पर्यटक, साधूसंत आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहतात. त्यामुळे सार्वजनिक सुविधा, वाहतूक व्यवस्था, आरोग्य सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा, अपघात व्यवस्थापन, आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था, तसेच मोजक्या कालावधीत वाढणाऱ्या लोकवस्तीसाठी तात्पुरत्या तसेच दीर्घकालीन मूलभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, शहरातील मूलभूत नागरी सुविधा सक्षम करणे अत्यावश्यक आहे. यामध्ये विशेषतः मलनिःसारण व्यवस्थेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करणे ही प्राथमिक गरज असून, पर्यावरणीय संतुलन राखणे, सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे आणि घाट परिसरातील स्वच्छता सुनिश्चित करणे यासाठी सक्षम मलनिःसारण व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनास अनुषंगाने आवश्यक असलेल्या कामांची अंमलबजावणी सुयोजित व समन्वयपूर्वक पार पाडण्यासाठी शासनस्तरावर तसेच स्थानिक पातळीवर कार्यवाही राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळयाच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्पास सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये मलनि:स्सारणाच्या सुविधा उपलब्ध देण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP - HAM Model) तत्वावर मलनि:स्सारण प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही नाशिक महानगरपालिकेकडून सुरु आहे. सदर प्रकल्पास नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आधारे नाशिक महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. सदर सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या स्विकृत निविदेची एकूण किंमत रुपये २६३२.९५ कोटी असून त्यामध्ये प्रकल्पाच्या २५ वर्षाच्या देखाभाल व दुरुस्तीच्या कामाच्या खर्चाचा देखील समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या पुढील २५ वर्षाचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च वगळता सदर प्रकल्पाच्या स्विकृत निविदेची किंमत रुपये १४८२.९५ कोटी आहे. नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेमधील अटी व शर्तीच्या अधीन राहून सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर प्रकल्प राबविण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा वित्तीय आकृतिबंध पुढीलप्रमाणे:

**(रु.कोटीमध्ये)**

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | प्रकल्प किंमत | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ७० %) | कंत्राटदाराने उभारावयाची रक्कम (प्रकल्प किंमतीच्या ३० %) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| नाशिक महानगरपालिका | १४८२.९५ | १०३८.०७ | ४४४.८८ |
| प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिनांकापासून २४ महिने | | | |

२. नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे: -

२.१. सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा नाशिक महानगरपालिका राहील.

२.२. सदर प्रकल्पास विहित तांत्रिक मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी करावी.

२.३. सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP - HAM Model) तत्वाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना व त्या संबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय, परिपत्रक व सूचना यानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

२.४. सदर प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेमधील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे कार्यान्वयन यंत्रणेवर बंधनकारक राहील.

२.५. सदर प्रकल्पाच्या निविदा कागदपत्रांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे नाशिक महानगरपालिकेवर बंधनकारक राहील.

२.६. सदर प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या प्रगतीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार नाशिक कुंभमेळ्यासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून शासनाकडून निधी वितरीत केला जाईल.

२.७. सदर प्रकल्पासाठी वितरीत करण्यात येणारा निधी हा मलनि:स्सारण प्रकल्पांच्या अनुषंगाने विविध केंद्र व राज्य योजनांच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यात्मक साध्यांवर

(Functional Outcome) आधारित असणार आहे. तसेच, सदर कार्यात्मक परिणामाची पूर्तता न झाल्यास सदर प्रकल्पास निधी वितरीत करण्यात येणार नाही. सदर बाबींची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांची राहील.

२.८. सदर प्रकल्पासाठी शासनाच्या हिश्याचा प्रथम हप्त्याचा निधी कार्यादेश निर्गमित केल्यानंतर नाशिक महानगरपालिकेस वितरीत करण्यात येईल. त्यानुसार प्रचलित शासन योजनेतील निकषानुसार मलनि:स्सारण प्रकल्पांच्या अनुषंगाने नमूद कार्यात्मक साध्यांची पूर्तता केल्यानंतर पुढील हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

२.९. सदर प्रकल्पासाठी उपलब्ध झालेल्या निधीमधून संबंधित कंत्राटदारास स्विकृत निविदा रकमेच्या १० टक्के मोबिलायझेशन ॲडव्हान्स (Mobilisation Advance) देण्याबाबतची कार्यवाही अनुज्ञता तपासून नाशिक महानगरपालिकेने करावी.

२.१०. अभियानाच्या वित्तिय आकृतीबंधानुसार राज्य शासनाने वितरीत केलेल्या निधीच्या प्रमाणात सदर प्रकल्पाच्या इतर भागधारकांनी त्यांच्या हिश्याचा निधी उभा करून सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे नाशिक महानगरपालिकेवर बंधनकारक असणार आहे.

२.११. सदर प्रकल्पासाठी निधी वितरीत करताना दिलेल्या सूचनांनुसार, सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने वितरीत निधीच्या प्रमाणात कंत्राटदाराने निधी उभारणे अनिवार्य राहील. सदर प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी त्याच प्रकल्पासाठी वापरणे बंधनकारक असून त्याचा वापर इतर प्रयोजनार्थ केल्यास सदर बाब ही गंभीर वित्तिय अनियमितता समजण्यात येईल.

२.१२. राज्य शासनामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर, मूळ प्रकल्प किंमतीमध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.ग्रापाधो-२०२१/प्र.क्र.१२२/पापु-०६, दिनांक २९ जून, २०२२ मध्ये नमुद कारणा व्यतिरिक्त वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणा व संबंधित कंत्राटदार यांची राहील. राज्य शासनामार्फत त्या करिता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही.

२.१३. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही नाशिक महानगरपालिकेची राहील.

२.१४. प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता व देयके प्रमाणित केल्यानंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामाची देयके १५ दिवसांत संबंधित कंत्राटदारास देण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

२.१५. सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार विहित निकषांनुसार नेमल्याबाबत नाशिक महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करणे आवश्यक राहील.

२.१६. सदर प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या घेऊन व प्रकल्पातील उपांगाच्या जागा महानगरपालिकेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करून व प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक इतर तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्याची खातरजमा आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी करावी.

२.१७. नाशिक महानगरपालिकेस यापूर्वी युआयडीएसएसएमटी/ अमृत अथवा इतर कोणत्याही योजनेंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या प्रकल्पातील उपांगे व या प्रकल्पातील उपांगे यामध्ये व्दिरुक्ती (Duplication) होत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयुक्त, नाशिक महानगरपालिका व सदर प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची राहील.

३. मोठ्या मलनि:स्सारण प्रकल्पाबाबतच्या प्रचलित शासन योजनेतील निकष/मार्गदर्शक सुचना सदर मलनि:स्सारण प्रकल्पास लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६०९१३५२३९९२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

AJINKYA VASANT BAGADE

Digitally signed by AJINKYA VASANT BAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department,
2.5.4.20=c2c536d8c69638eb0722b58787e3271291abd492dd102db07dd9f19890bb74ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6c08d792cf36e6c4debdaf51291af7la70ad1cabea48c176da37b5a461cb674, cn=AJINKYA VASANT BAGADE
Date: 2025.06.09 13:53:24 +05'30'

**(अजिंक्य बगाडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) विभाग यांचे खाजगी सचिव.
४. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक.
५. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक.
६. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. आयुक्त तथा संचालक, नगरपंचायत प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
९. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग.
११. जिल्हाधिकारी, नाशिक.
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, नाशिक.
१३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका.
१४. निवड नस्ती, नवि-२५.